पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जून २०२०, खंड १९, अंक ३, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● स्वयंशिस्त

५ ● पंचविशीतील 'व्यापार'

१५ ● समाजमाध्यमांचे धगधगीत वास्तव


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी


**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक ३) जून २०२०**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# स्वयंशिस्त

'कोविड १९' नावाच्या अरिष्टाने वेटाळलेल्या आजच्या जगात त्या विषाणूचे सावज होण्यापासून बचावण्याचा एकच एक मार्ग आपल्या सगळ्यांच्या हातात दिसतो...आणि तो म्हणजे स्वयंशिस्त पाळणे ! त्याला इलाजच नाही. आजघडीला तरी या विषाणूचा नायनाट करील असे औषध अथवा लस आपल्यापाशी नाही. ती केव्हा उपलब्ध होईल ते सांगणेही आजमितीला अवघडच आहे. शक्य तेवढी प्रतिबंधात्मक काळजी घेणे एवढेच काय ते करता येण्याजोगे आहे. गर्दीमध्ये जाणे अथवा गर्दी, जमाव टाळणे, वारंवार हात धुणे आणि नाक व कान झाकून घेणे हीच सध्याची त्रिसूत्री. या त्रिसूत्रीचा अवलंब आपण किती कसोशीने करतो त्यांवर 'कोविड १९'च्या फैलावाला बसणा-या पायबंदाची परिणामकारकथा अवलंबून राहील. ज्या तीन गोष्टी आपल्याला कटाक्षाने टाळाव्या लागणार आहेत त्यांतील दोन बाबी शारीरिक स्वच्छतेसंदर्भातील आपल्या सवयींशी तर उरलेली तिसरी बाब आपल्या सामाजिक जनरीतीशी संलग्न आहे. मुळातच, आपल्याकडे व्यक्तिगत काय अथवा सार्वजनिक काय, स्वच्छता आणि आरोग्य यांच्या जपणुकीसंदर्भातील संवेदनशीलतेचा ब-यापैकी घाऊ क अभावच दिसतो. सार्वजनिक इमारतींच्या भिंती व कोपरे, रस्ते, सार्वजनिक वाहतुकीची साधने, क्रीडांगणांसारख्या मोकळ्या सार्वजनिक जागा...इतकेच काय, अगदी सार्वजनिक रु ग्णालयांमधील भिंती व कोपरेदेखील विडा आणि/अथवा गुटखा चघळून बिनदिक्कतपणे मारलेल्या पिचका-यांनी रंगलेले असतात. नाकातील अथवा कानांतील मळ हाताने काढून तो वाटेल तिथे पुसणे, घरातील कचरा सवंगपणे कोठेही भिरकावून देणे, इमारतींमधील सांडपाणी रस्त्यांवर सोडणे...ही सारी आपली सामाजिक वैशिष्ट्येच होत. उद्या, कोविड १९चा नायनाट करणारी प्रभावशाली लस अथवा औषधे यांचा आपल्यावर मारा केला तरी, जोवर या गलिच्छ सवयींना आपल्याकडून मूठमाती दिली जात नाही तोवर कोणत्या ना कोणत्या विषाणूचा संसर्ग अथवा बाधा फैलावण्याचा धोका आपल्या सभोवती रेंगाळत राहीलच. हा प्रश्न औषधाइतकाच आपल्या जीवनमूल्यांशीही जखडलेला आहे.



स्वयंशिस्त हा आपल्या जीवनराहाटीचा भाग नसेल तर विविध पातळ्यांवर जे संघर्ष, ज्या अडचणी, जे प्रश्न आपल्या पुढ्यात उभे ठाकतात त्यांचा मागोवा हाच 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांना जोडणारा समान अंतर्गत दुवा राहिलेला आहे. १९९५ सालानंतर गेले पाव शतक आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन-व्यवस्थापन सकारात्मक पद्धतीने घडवून आणत वैश्विक व्यापाराला बरकत आणणा-या जागतिक व्यापार संघटनेच्या चौकटीचा गैरवापर करण्याच्या प्रवृत्तीपायी ते व्यासपीठ आज जणू निरर्थक व प्रभावहीन बनू पाहते आहे. इंटरनेट, मोबाइल, गूगल, फेसबुक यांसारख्या समाजमाध्यमांचा ताळतंत्रहीन वापर आज अनेकानेक सामाजिक दुरितांना आवतण देतो आहे. स्वयंशिस्तीचे महत्त्व मनावर बिंबवणा-या घटितांचा पुढील पानांमध्ये मांडलेला तपशील कोणालाही अंतर्मुख होण्यास भाग पाडणारा असाच आहे. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

स्मरणरंजन

# पंचविशीतील ‘व्यापार’

कोणीही व्यक्ती असो अथवा संस्था, तिच्या वयाची पंचविशी म्हणजे तारुण्याच्या ऐन बहराचा काळ. नव्या उमेदीने भविष्याकडे बघण्याचा हा टप्पा. नवनवीन स्वप्ने रंगवायची आणि ती वास्तवात उतरविण्यासाठी उमेदीने मेहनत करण्याचे ते वय. पुढील कर्तृत्वाबद्दल स्वतःच्या आणि स्वतःबाबत इतरांच्याही अपेक्षांचा वेल मांडवावर उंच चढण्या-चढविण्याचे ते पर्व. मात्र, ऐन बहराच्या त्या वळणावरच एखादा माणूस खंगायला लागला तर कसे वाटेल...? कोणीही झाले तरी मनोमनी कळवळा, खेद वाटणारच. ते स्वाभाविकही आहे. अत्यंत मोठ्या अपेक्षा मनाशी बाळगून वैश्विक समुदायाने बरोबर पाव शतकापूर्वी, म्हणजे, १ जानेवारी १९९५ रोजी जन्माला घातलेल्या ‘जागतिक व्यापार संघटना’ नामक संस्थात्मक व्यासपीठाची आजची अवस्था नेमकी अशीच आहे. ऐन पंचविशीच्या भरात आलेल्या जागतिक व्यापार संघटनेला, अमेरिका आणि चीन या दोन बलाढ्य अर्थसत्तांमध्ये अलीकडील पाच-सात वर्षांपासून धुमसत असलेल्या व्यापारयुद्धाची कसर पोखरते आहे. वरून चांगले डेरेदार दिसणारे एखादे झाड आतल्या बाजूने किडीने पछाडलेले असावे, तसे जागतिक व्यापार संघटनेचे सध्याचे स्वरूप आहे. अशा महावृक्षाच्या बाह्य आकाराकडे पाहून विस्मित होण्यापेक्षाही, अंदरकी बात ठाऊक असणा-या दर्शकांना त्याच्याबद्दल कणवच अधिक वाटायला लागते. जगातील तब्बल १६४ देश सदस्य असलेल्या आणि वैश्विक स्तरावरील ९८ टक्के व्यापार कक्षेत घेतलेल्या जागतिक व्यापार संघटनेची अवस्था, अमेरिका आणि चीन यांच्यादरम्यानच्या व्यापारी भाऊबंदकीपायी ‘बडा घर पोकळ वासा’, अशी होऊ घातलेली आहे. ही शोकान्तिका केवळ ‘जागतिक व्यापार संघटना’ या व्यासपीठाची नाही. खरी खंत वाटते ती, देशादेशांदरम्यान बहुस्तरीय असा खुला, मुक्त व्यापार सुलभतेने घडून यावा यासाठी दुस-या महायुद्धानंतर वैश्विक स्तरावर प्रसवलेल्या धोरणात्मक मानसिकतेलाच ओहोटी लागावी या वस्तुस्थितीबाबत.



हे असे का घडत असावे याचा काही एक अदमास बांधायचा तर गेल्या पाव शतकी वाटचालीचा, ढोबळ का होईना पण, आलेख मांडायला हवा. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर तीनच वर्षांनी, म्हणजे, १९४७ साली अस्तित्त्वात आलेल्या आणि १९४८ सालापासून सक्रिय बनलेल्या ‘जनरल ॲग्रिमेन्ट ऑन टॅरिफस् ॲन्ड ट्रेड’ (GATT - गॅट) या व्यवस्थेचा त्या नंतर ४७ वर्षांनी (१९९५ साली) पुनरावतार घडून आला तो जागतिक व्यापार संघटनेच्या नामरूपाने. १९४७ ते १९९५ या काळात ‘गॅट’च्या माध्यमातून जागतिक स्तरावर व्यापारविषयक चर्चांच्या एकंदर आठ फे-या झडल्या. त्यांतील आठवी फेरी - जिला ‘उरुग्वे राऊंड’ - असे संबोधले जात असे, सन १९८६ ते १९९५ इतका प्रदीर्घ काळ चालली. चर्चेच्या त्या फेरीची परिणतीच जागतिक व्यापार संघटना साकारण्यात घडून आली.

त्या आधी सुमारे एक ते दीड दशक जगातील निरनिराळ्या देशांमध्ये आर्थिक पुनर्रचना पर्वाचे पडसाद कमी-अधिक प्रमाणात उमटायला लागलेले होते. उत्पादनाच्या तंत्रशास्त्रामध्ये एकंदरीनेच घडून आलेली प्रचंड प्रगती, माहिती-तंत्रज्ञानाच्या नवशाखेचा सर्वदूर झपाट्याने झालेला विस्तार, वाहतूक आणि संदेशवहनाच्या क्षेत्रात साकारलेली अपूर्व अशी क्रांती यांमुळे वैश्विक स्तरावरील श्रमविभागणी पूर्णपणे नव्याने रंगरूप धारण करत होती. सेवाउद्योगाचा पसारा सर्वच देशांमध्ये वाढत होता. देशादेशांमधील व्यापारात वस्तू व जिनसांच्या जोडीनेच सेवांचा टक्काही वाढत होता. परकीय भांडवलाच्या हातात हात घालून तंत्रज्ञानाचे वहन आणि हस्तांतरण चौफेर घडून येत होते आणि आजही त्यांत खंड नाही. साहजिकच, बौद्धिक स्वामित्व हक्कांचा नवीन पैलू त्यांद्वारे वैश्विक विचारविश्वात प्रकर्षाने चर्चाविषय बनला.

हे सगळे गतिमान बदल सामावून घेत त्यांचे परिणामकारक व्यवस्थापन करण्यास ‘गॅट’ची व्यवस्था अपुरी शाबीत होऊ लागली आणि अखेर १ जानेवारी १९९५ या दिवशी ‘गॅट’चे विसर्जन केले जाऊन जागतिक व्यापार संघटनेचा अवतार झाला. आता, स्थापनेनंतर पाव शतक ओलांडते - न ओलांडते तोच जागतिक व्यापार संघटनेच्या अर्थवत्तेपुढे प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे अथवा राहते आहे.

**‘गॅट’च्या स्थापनेची पार्श्वभूमी**

देशादेशांमध्ये खुला, मुक्त व्यापार वाढीस लागावा हा ‘गॅट’च्या स्थापनेमागील मूळ हेतू. जागतिक व्यापार संघटनेचा हेतूही तोच. ‘गॅट’ अथवा जागतिक व्यापार संघटनेसारखी व्यासपीठे निर्माण होण्यास तात्कालीक कारणे जशी हातभार लावतात त्याचप्रमाणे काही एक विशिष्ट प्रकारची इतिहासदृष्टीदेखील तिचा प्रभाव पाडत असते. वैश्विक स्तरावर अव्याहत चालू राहणारा व्यापाराचा प्रवाह ही केवळ आणि निव्वळ आर्थिक बाब होय, असे समजणे अपुरे ठरेल. देशादेशांदरम्यानच्या व्यापारी संबंधांना प्राचीन काळापासूनच राजनैतिक, व्यूहरचनात्मक तसेच सामरिक पैलूही जडलेले दिसतात. किंबहुना, व्यापार आणि परराष्ट्रसंबंध यांची सांगड पुरातन असल्याचाच दाखला आपल्याला इतिहासात डोकवले तर मिळतो. व्यापाराबाबत खुलेपणा राखण्यात अपयश येण्याने वैश्विक स्तरावरील स्थैर्य व शांततेसही धोका उत्पन्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही काही अमेरिकी मुत्सद्यांचे विवेचन दिसते. खुल्या बाजारपेठा व्यवहारात लोकशाही प्रजासत्ताक राज्यव्यवस्थांचे हात बळकट करतात, असेही एक उपप्रमेय या संदर्भात अमेरिकी धोरणकर्ते मांडत आलेले आहेत.

निखळ अमेरिकाकेंद्री असा हा दृष्टिकोन जरी घटकाभर बाजूला ठेवला तरी, व्यापारवृद्धी ही राज्यविस्तारामागील एक प्रबळ प्रेरणा असल्याचे पुरेसे दाखले पूर्वेतिहासात आपल्याला गवसतात. पूर्व आणि पश्चिम यांच्यादरम्यानच्या आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक नातेसंबंधांच्या जडणघडणीमध्ये केंद्रवर्ती महत्त्व राहिलेल्या ‘सिल्क रूट’च्या संदर्भात चीनचा इतिहास या ठिकाणी प्रस्तुत आणि मननीय ठरावा. हान राजवंशाच्या अधिपत्याखालील चीनने आपल्या व्यापारी हितसंबंधांचे संगोपन करण्याच्या हेतूने ‘सिल्क रूट’च्या संरक्षणासाठी ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात प्रसंगी लष्करी बळाचा वापर करण्यासही मागेपुढे बघितले नव्हते. अन्नधान्याचा पुरवठा अबाधित राखण्याच्या हेतूने ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात रोमकडून इजिप्तवर स्वारी केली गेली होती. ब्रिटनच्या व्यापारी हितसंबंधांचे संवर्धन जारी राखण्याच्या उद्देशानेच ईस्ट इंडिया कंपनीने ब्रिटिश परराष्ट्रधोरणाचा झोत दक्षिण आशियाकडे वळविल्याचे वास्तवही सर्वज्ञात असेच आहे. पुरी



दोन शतके पश्चिमी राष्ट्रांपासून अलिप्त राहिलेल्या जपानने अमेरिकेबरोबर व्यापारी तसेच राजनैतिक संबंध प्रस्थापित करावेत व त्यांद्वारे जपानी बाजारपेठांचे दरवाजे अमेरिकी व्यापारासाठी किलकिले व्हावेत, या हेतूने कमोडोर मॅथ्यू पेरी याने १८५३-५४ या वर्षात जपानविरुद्ध सागरी मोहिम उघडली होती. तर, त्या नंतर केवळ १२ वर्षांनी - म्हणजे, १८६५-६६ - या वर्षी चीनबरोबर अमेरिकेने व्यापारविषयक तह केला.

परराष्ट्राबरोबरील व्यापार खुला असणे हे आर्थिक-राजनैतिकदृष्ट्या लाभाचे कुळ असल्यामुळेच, मुक्त व्यापारावर युद्धकाळात लादली गेलेली बंधने पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात सर्वांनाच जाचू लागली. ‘गॅट’च्या निर्मितीचे बीजारोपण त्या जाचातच घडून आले. १९१४ साली पहिल्या महायुद्धाचा बिगुल फुंकला गेला. नेमस्त व वाजवी शुल्क आकारणी तसेच वाढता वैश्विक व्यापार यांच्या माध्यमातून बऱ्यापैकी आर्थिक सुबत्ता जगाच्या पाठीवर तोवर चढती-वाढती राहिलेली होती. १९१८ साली पहिले महायुद्ध संपले आणि युद्धकाळात सावटाखाली आलेला जागतिक व्यापार १९२०च्या दशकादरम्यान अत्यंत धीम्या गतीने पुन्हा मान वर काढू लागला. विदेशी व्यापारावर युद्धकाळात जारी केलेले निर्बंध बहुतेक देशांनी हळूहळू मागे घेतले हे खरे, परंतु, व्यापारशुल्कांचे युद्धकालीन दर मात्र होते त्याच पातळीवर युद्धोत्तर काळातही राखले गेले.

अशा परिस्थितीमधून वाट काढत पुढे चाल करत असलेल्या जागतिक व्यापाराला दुसरा मोठा फटका बसला तो १९२९ सालाच्या सुमारास उद्भवलेल्या जागतिक मंदीचा. देशी अर्थव्यवस्थांचे संरक्षण मंदीच्या झळांपासून करण्याच्या हेतूने देशोदेशींच्या सरकारांनी विदेशी व्यापारावरील बंधने अधिकच कडक केली. वित्तीय तसेच राजकोषीय घटकच मंदीला मुख्यतः कारणभूत ठरलेले असले तरी, आर्थिक घसरणीचे रूपांतर घनघोर अशा अरिष्टामध्ये घडून येत मंदीची तीव्रता अधिक सघन बनण्यास व्यापारावरील स्पर्धात्मक बंधनांचाही हातभार लागला, हे वास्तव नाकारता येण्याजोगे नाही. हे कमी नव्हते म्हणून की काय, पण, आपापल्या अर्थव्यवस्थांचे मंदीपासून संरक्षण करण्यासाठी व्यापारावरील निर्बंध अधिकच कडक करण्याचा पवित्रा देशोदेशी स्वीकारला गेला.

**रोगापेक्षा इलाज जालीम**

मंदीपायी ओढवलेल्या बेरोजगारीवर उपाययोजना करण्याची निकड सगळ्यांच देशांना भासत होती. साहजिकच, आयातीला लगाम घालत देशी रोजगारनिर्मितीला चालना देण्याचे पाऊल देश उचलू लागले. 'बुडत्याचा पाय खोलात' असा अनवस्था प्रसंग त्यांपायी ओढवला. एका देशाची आयात ही दुस-या देशाची निर्यात असते, या व्यापारी न्यायाचा विचार करता, आयातीवर निर्बंध जारी करत देशांतर्गत रोजगारवाढीला बढावा देण्याची व्यूहात्मक रचना आत्मघातकी शाबीत झाली. या धोरणापायी जागतिक स्तरावरील व्यापाराचा कणा खचला आणि मंदीचे सावट अधिकच गडद बनले.

या घटनाक्रमाला गती येण्यासंदर्भातील काही एक जबाबदारी अमेरिकेच्याही पदरात जाते. अन्नधान्यपिकांच्या बाजारभावांतील घसरणीपासून अमेरिकी शेतक-यांना संरक्षक चिलखत पुरविण्याच्या हेतूने अमेरिकी शासनकर्त्यांनी आयातशुल्कांमध्ये १९३० साली वाढ जारी केली. अमेरिकेशी व्यापारी संबंध असणा-या देशांकडून, साहजिकच, त्या विरोधात प्रतिक्रिया उमटली. कॅनडा, स्पेन, इटली आणि स्वित्झर्लंडसारख्या व्यापारी संबंधांतील अमेरिकेच्या भागीदार देशांनी लगोलग 'जशास तसे' उत्तर दिले. आयात शुल्कांमध्ये वाढ घडवून आणण्याचा पंथ अन्य देशांनीही मग अवलंबला. या अवघ्या घडामोडींपायी जागतिक व्यापार तर आकुंचन पावलाच परंतु, देशादेशांदरम्यान तोवर विणली गेलेली बहुस्तरीय व्यापारी संबंधांची व्यवस्थाही त्यांपायी विसविशीत बनली.

या व्यापारी आणि आर्थिक फेरमांडणीचे पडसाद राजकीय स्तरावरही उमटले. मंदीच्या चपेट्यांपासून देशी अर्थव्यवस्थांचे संरक्षण समर्थपणे करण्यात लोकशाही प्रजासत्ताक राजवटींना अपयश येत असल्याची लोकभावना बळकट बनून हुकुमशाही प्रवृत्तीच्या नेतृत्त्वांबाबत जर्मनी, इटली यांसारख्या देशांमध्ये सर्वसामान्यांच्या मनात आकर्षण निर्माण होऊ लागले. जवळपास याच मानसिकतेचे पुनरुज्जीवन, जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेची पंचविशी उलटत असण्याच्या आजच्या टप्प्यावर होताना आपण पाहतो आहोत, ही बाब या ठिकाणी अधोरेखित करुन ठेवावयास हवी.



विविध देशांमधील आर्थिक राष्ट्रवादाच्या भावनेला त्या संपूर्ण पर्वादरम्यान कमी-अधिक प्रमाणात बळकटी आल्याचेच चित्र प्रकर्षाने दिसत राहिले. त्या संदर्भात, १९३०च्या दशकाच्या पूर्वार्धामध्ये वैश्विक स्तरावर सर्वसाधारणपणे तीन प्रवाह सक्रिय राहिल्याचे ध्यानात येते. मंदीतून वर उठून जागतिक व्यापाराचे लाभ पदरात पाडून घेण्यासाठी देशी चलनांचे अवमूल्यन घडवून आणण्याची एक प्रकारे जणू स्पर्धाच चालू झाली. यांतून भले कोणाचेच झाले नाही. दुसरे म्हणजे, देशी अर्थव्यवस्थांभोवती व्यापारावरील निर्बंधांची, जबर आयात-निर्यात शुल्कांची जणू भक्कम तटबंदी उभारण्याकडे जवळपास सगळ्यांच देशांनी त्यांचा मोहरा वळवला. १९३० ते १९३२ या अवघ्या दोनच वर्षांच्या काळात जगभरातील तब्बल ६० देशांनी आयात-निर्यात शुल्कांमध्ये लक्षणीय वाढ जारी केली. तिसरीकडे, परकीय चलने आणि परकीय चलनांतील व्यवहारांवर अंकुश राखण्याची मानसिकताही त्याच काळात देशोदेशी बळावली.

परंतु, याच मानसिकतेमधून बाहेर पडण्याची गरज मूळ धरायला लागल्याची चिन्हेही समांतर रीतीने त्याच वेळी दिसायला सुरुवात झालेली होती. त्यांत आघाडीवर होती अमेरिका. ही खरी गंमत होय. संरक्षक, निर्बंधपोषक अशा प्रकारची व्यापारी धोरणे अवलंबण्यात १९३०च्या दशकाच्या प्रारंभी अमेरिकाच सर्वांत आघाडीला होती. आणि आता, आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध घटवण्याबरोबरच अन्य देशांच्या सहकार्याने वैश्विक स्तरावरील व्यापाराला चालना देण्याबाबत त्याच अमेरिकेने सर्वप्रथम पुढाकार घेतला. त्या दिशेने एक पाऊल उचलत १९३४ साली अमेरिकी संसदेने कायदा मंजूर करून व्यापारी शुल्कांमध्ये कपात करण्याचे सत्र चालू केले. त्या नंतरच्या अवघ्या दशकभरादरम्यानच, म्हणजे १९४४ सालापर्यंत, अमेरिकेने एकंदर २७ देशांबरोबर द्विपक्षीय व्यापारी करारमदार केले. त्यांतल्या त्यांत, ब्रिटनबरोबरील व्यापारी संबंध सघन बनविण्याच्या दृष्टीने द्विपक्षीय व्यापारी रुजवातीची प्रक्रिया अमेरिकेने प्रकर्षाने गतिमान बनविली. दुस-या महायुद्धाच्या ज्वाळांमधून पोळून निघालेल्या जगाचे व्यापक स्तरावरील आर्थिक धोरण कसे असावे, या बाबत अमेरिका आणि ब्रिटन यांच्यादरम्यान विचारविनिमयाचे सत्र या सगळ्यांतून प्रसवले.

**‘गॅट’ची स्थापना हा योगायोग**

या सगळ्या घडामोडींच्या आगेमागेच, युद्धोत्तर काळातील जगाची मानसिकताही बदलायला सुरुवात झाली होती. दुस-या महायुद्धादरम्यानच्या काळात जोपासलेल्या आर्थिक संरक्षणवादाला सोडचिठ्ठी देत विविध स्तरांवर वैश्विक सहकार्याची भूमिका देशादेशांदरम्यान क्रमाने मूळ धरायला लागली. २४ ऑक्टोबर २०२० रोजी वयाची पंच्याहत्तरी ओलांडत असलेल्या संयुक्त राष्टांची २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी झालेली स्थापना हे त्या पालटत्या मानसिकतेचे ठसठशीत दृश्य प्रतीक ठरले. या नवनिर्मित व्यासपीठांतर्गत हॅवाना या ठिकाणी १९४७-४८सालामध्ये आयोजित करण्यात आलेल्या व्यापार व रोजगार परिषदेद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन) अस्तित्वात आली. व्यापारविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्यास चालना देणे आणि व्यापारविषयक धोरणांसंदर्भात देशादेशांमध्ये उद्‌भवलेल्या वादांवर तोडगा शोधून काढणे, ही दोन मुख्य उद्दिष्टे आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेने तिच्या पुढ्यात ठेवलेली होती.

त्या सगळ्या घडामोडींदरम्यान, अगदी योगायोगानेच, ‘जनरल ॲग्रिमेन्ट ऑन टॅरिफस् ॲन्ड ट्रेड - GATT ’ ही प्रणाली जन्माला आली. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेची स्थापना हॅवाना या ठिकाणी होत असतानाच, १९४७ साली, हंगामी अथवा तात्पुरती एक तरतूद या स्वरूपात GATT ही प्रणाली अस्तित्त्वात आली. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या स्थापनेदरम्यान तिच्या सनदेवर एकूण ५४ देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्ष-या केल्या. परंतु, स्वाक्ष-या करणा-या एकाही देशाने त्या सनदेला आपली अधिकृत अधिसंमती मात्र प्रदान केली नाही. त्यांत अमेरिकेचाही अंतर्भाव होताच. असे असले तरी, जिनिव्हा इथे झालेल्या त्या चर्चा-विचारविनिमयाद्वारे काही महत्त्वाच्या बाबी साध्य झाल्याच. आंतरराष्ट्रीय व्यापारावर आकारल्या जाणा-या शुल्कांमध्ये कपात जारी करण्यास मान्यता देण्याबरोबरच, आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भात काही सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वेही अंगीकारण्यात आली. त्या तत्त्वांनाच ‘GATT ’ असे संबोधले जाऊ लागले. अगदी अकल्पितपणेच साकारलेल्या या व्यवस्थेने ४५ वर्षांच्या तिच्या कार्यकालादरम्यान वैश्विक व्यापाराच्या भरभराटीस भरीव हातभार लावला.



निव्वळ योगायोगानेच साकारलेल्या ‘गॅट’नामक लघुरूपाच्या या व्यासपीठाला कायदेशीर तसेच संस्थात्मक अस्तित्त्व प्रथमपासूनच लाभले नव्हते. आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळावी, देशादेशांदरम्यान मुक्त व खुला व्यापार घडून येण्यात अडथळा ठरणारी बंधने दूर व्हावीत, देशादेशांमध्ये व्यापारी स्वरूपाचे करारमदार होत असताना त्यांत उद्‌भवणा-या भेदभावाचे उच्चाटण घडावे यासाठी सहमतीने निर्माण करण्यात आलेली नियमांची व्यवस्था हेच ‘गॅट’च्या व्यासपीठाचे आद्य रूप-स्वरूप होते व ते तसेच राहिले. मुख्य म्हणजे, ‘गॅट’चे व्यासपीठ केवळ वस्तुरूप जिनसांच्या आंतरदेशीय व्यापारासंदर्भातील नियमांच्या चौकटीपुरतेच कार्यरत होते. परंतु, १९८०च्या दशकादरम्यान देशोदेशी प्रवर्तित झालेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वानंतर एकंदरच वैश्विक अर्थकारणामध्ये सेवाक्षेत्राचा असणारा टक्का वाढला आणि त्याचे प्रतिबिंब जागतिक व्यापारामध्येदेखील डोकवू लागले. मात्र, ‘गॅट’च्या कार्यचौकटीत सेवांच्या आयात-निर्यातीसंदर्भात काहीच तरतुदी नव्हत्या. वैश्विक स्तरावरील खुल्या व्यापाराला चालना मिळाल्यानंतर साहजिकच देशादेशांदरम्यान भांडवलाचे चलनवलनही मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आणि त्यांतूनच तंत्रज्ञानाचे हस्तांतरण सक्रिय बनून बौद्धिक स्वामित्वाचा पैलू प्रकर्षाने पृष्ठभागावर आला. या सगळ्या बदलत्या प्रवाहांची पुरेशी दखल घेण्याबाबत ‘गॅट’चे व्यासपीठ, मग, अपुरे शाबीत होऊ लागले.

अखेर, वैश्विक स्तरावरील पालटलेले आर्थिक तसेच वित्तीय वास्तव, जागतिक व्यापाराचे बदलत चाललेले रंगरूप, सेवाक्षेत्राचा जगभरच होत आलेला अप्रतिहत विस्तार, भांडवल तसेच सेवांचे वेगाने होत असणारे हस्तांतरण या सगळ्या परिवर्तनाला समर्थपणे सामावून घेऊ शकेल अशा नवीनच व्यवस्थेची गरज उत्कटतेला पोहोचली आणि १ जानेवारी १९९५ या दिवशी ‘गॅट’चे विसर्जन घडून येऊन जागतिक व्यापार संघटनेचा अवतारवजा जन्म झाला. स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे जागतिक व्यापार संघटनेचे प्रधान कार्यालयही स्थापन झाले. जन्मापासूनच जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठाला संस्थात्मक चेहरा लाभलेला होता. १९९५ साली अस्तित्त्वात आलेल्या ‘जागतिक व्यापार संघटना’ या व्यासपीठाचे रंगरूप आणि ‘गॅट’चे स्वरूप यांत गुणात्मक असे मूलभूत फरक होते.

मुख्य म्हणजे, ‘गॅट’च्या व्यवस्थेचे घटक असलेले सहभागी देश हे तदर्थ करार व शर्तींनी त्या व्यासपीठाशी जोडून घेण्यात आलेले होते. ते ‘गॅट’चे सदस्य नव्हते. जागतिक व्यापार संघटनेच्याबाबतीत तसे नाही. जागतिक व्यापार संघटनेशी गुंफले गेलेले १६४ देश हे या संघटनेचे सदस्य आहेत. व्यापारादरम्यान देशादेशांमध्ये कारणपरत्वे निर्माण होणा-या विसंवादांचे अथवा वादांचे निराकरण करण्यासंदर्भातील ‘गॅट’ची व्यवस्था ही त्या मानाने कमकुवत आणि अल्प प्रभावशाली होती व ती तशीच दुर्बळ पुढेही राहिली. व्यापारविषयक तंट्यांचे निराकरण करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने निर्माण केलेली व्यवस्था अधिक नेमकी, कडक व प्रभावशाली राहिली. स्थापनेनंतरचे दीड दशक, म्हणजे, १९९५ ते २०१५ हा कालावधी सगळ्यांच देशांच्या लेखी वैश्विक व्यापाराच्या दृष्टीने सकारात्मक शाबीत झाला. २०१६ साली सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांनी एकंदरीनेच जागतिकीकरणाच्या आगेकूचीबाबत असमाधान मुखर करायला सुरुवात केली आणि एकंदरीनेच जगाच्या आर्थिक घडीमध्ये चलबिचल होऊ लागली. या बदलामागील कार्यकारणभाव जाणून घेणे या टप्प्यावर उद्बोधक ठरते.

चीनविरुद्ध व्यापारी युद्ध छेडल्याचे प्रगट ऐलान अमेरिकेने २०१८ साली केले ही बाब खरी असली तरी, जागतिक व्यापार संघटना हे जागतिकीकरणाच्या ज्या व्यापक प्रक्रियेचे एक संस्थात्मक प्रतीक होय त्या प्रक्रियेस बळ व अधिष्ठान पुरविणा-या उदारीकरणाच्या धोरणदृष्टीसंदर्भातच १९९०च्या दशकापासून तिथे असमाधान व्यक्त होऊ लागल्याचे दाखले दिसतात. हमीच्या आर्थिक विकासाचे दमदार ‘मॉडेल’ म्हणून ‘उदारीकरण-जागतिकीकरण-खासगीकरण’ या त्रिसूत्रीचा अवलंब, कमी-अधिक प्रमाणात का होईना पण, अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये काळाच्या ओघात निर्माण झालेला विविध स्तरांवरील असमतोल, सघन बनत चाललेले पर्यावरणीय -हासाचे संकट, उदारीकरणाच्या लाभांपासून वंचित राहिलेल्यांच्या पदरी येणारी अभावग्रस्तता, वाढत्या खर्चाळू मानसिकतेमधून वाढणारा कर्जांचा बोजा...अशांसारख्या अनेकानेक आनुषंगिक पैलूंच्या विरोधात आवाज उठविणारी व्यासपीठे, निषेधाचा सूर बळकट करणारे गट-समूह १९९०च्या दशकादरम्यान जगभरात ठायीठायी सक्रिय बनले.



**मूळ खदखद जागतिकीकरणाबाबतच**

त्या सगळ्या अस्वस्थतेला २१व्या शतकातील दुस-या दशकाच्या प्रारंभीच अवचित तोंड फुटले ते पुन्हा अमेरिकेतच. जागतिकीकरणाच्या वा-यांविरोधात १९९०च्या दशकापासूनच धुमसणा-या मानसिकतेला तेलपाणी पुरविले ते न्यूयॉर्कमधील झुकोटी पार्कच्या परिसरात २०११ सालातील सप्टेंबर महिन्यापासून गर्जलेल्या ‘ऑक्युपाय वॉल स्ट्रीट’ या उस्फूर्त जन-आंदोलनाने. १७ सप्टेंबर २०११ या दिवशी या आंदोलनाचे शिंग फुंकले गेले. आंदोलनाची धग २०१२ सालातील फेब्रुवारी महिन्यापर्यंत टिकून होती. कोणत्याही प्रकारचे एकमुखी राजकीय अथवा अन्य नेतृत्व न लाभलेल्या त्या चळवळीचे बीजारोपण घडून आले ते अमेरिकी ‘सब्प्राइम’ कर्जांचा फुगा २००८ साली धाडकन फुटून त्याच्यातून निपजलेल्या परिस्थितीमध्ये. *(कृपया पृष्ठ क्रमांक २३ पाहावे)*

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

सामाजिक

# समाजमाध्यमांचे धगधगीत वास्तव

इंटरनेट आणि मोबाइलचा शोध ही मानवी प्रगतीच्या वाटचालीतील एक महत्त्वाची कमाई मानली जाते. इंटरनेटचा शोध लागल्यामुळे जग एका जाळ्यात गुंफले गेले तर मोबाइलने वैश्विक समुदायाचे जगणेच बदलून टाकले. आपल्या मुलभूत गरजांइतकीच निकडीची बाब म्हणून त्याकडे आता पाहिले जाऊ लागले आहे. परस्परसंपर्काच्या आणि संवादाच्या गरजेतून या सगळ्याची सुरुवात झाली आणि त्यात भर घालणारे अनेक नवनवीन शोध लागू लागले. 'गुगल'वर हव्या त्या माहितीचा शोध घेता येऊ लागला आणि ई-मेलद्वारे थेट 'ऑनलाइन' पत्र पाठवण्याची सुविधा प्राप्त झाली. या सर्व सुविधा लोकांचे जगणे अधिक सुलभ व्हावे या भूमिकेतूनच सुरू झालेल्या होत्या. परस्परांच्या संपर्कात राहण्याची व संवादाची वाढती ओढ लक्षात घेऊन लोकांना सतत एकमेकांशी जोडून ठेवणारे व्यासपीठ हवे म्हणून जन्म झाला तो समाजमाध्यमांचा अर्थात 'सोशल मीडिया'चा.

समाजमाध्यमांचे बलस्थान लक्षात आले तशी ती वेगाने लोकप्रिय होत गेली आणि त्याच्याशी अखंड जोडलेले राहणे ही काळाची गरज बनत गेली. संपर्कात नसलेल्यांनाही एकमेकांशी जोडणारी, दूर अंतरावर असणा-यांशीही सहज संवाद साधू देणारी, परस्परांना बांधून ठेवणारी, आपल्या मतांना व्यक्त होण्यासाठी मोकळे आणि हक्काचे व्यासपीठ देणारी, जगण्यातील आनंदाचे क्षण 'शेअर' करून 'लाइक्स' मिळवण्याची सोय असणारी समाजमाध्यमे अल्पावधीत प्रचंड लोकप्रिय झाली. सद्यःस्थितीत अक्षरशः अब्जावधी लोक समाजमाध्यमांचा वापर करीत आहेत. जणू वरदान भासणारी ही समाजमाध्यमे निरंकुश असल्याने ते एक दुधारी शस्त्र ठरू शकते ही जाणीव तेव्हा कुणालाच झाली नाही. मात्र, आता त्याचे धोके स्पष्टपणाने दिसू लागलेले आहेत. यातून निर्माण होत असलेले



सामाजिक, मानसिक धोके लक्षात घेणे गरजेचे असून त्या संदर्भात तातडीने काही बदल न केल्यास ती एका भीषण अराजकाची नांदी ठरेल, अशी भीती जाणकार व्यक्त करू लागले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, The Social Dilemma हा माहितीपट याच वास्तवावर नेमकेपणाने बोट ठेवताना दिसतो. एकीकडे समाजमाध्यमांचे सतत वाढणारे, सहजासहजी न सुटणारे व्यसन आणि दुसरीकडे त्यात अधिकाधिक लोक अडकावेत म्हणून समाजमाध्यमांची मालकी असणा-यांनी जाणीवपूर्वक विकसित केलेले 'बिझनेस मॉडेल' यांच्यावर हा माहितीपट प्रकाश टाकतो. अमेरिकी चित्रपट दिग्दर्शक Jeff Orlowski यांनी हा माहितीपट दिग्दर्शित केला आहे.

व्यक्तिगत आयुष्यापासून ते सामाजिक स्वास्थ्यापर्यंत सगळ्यांच बाबतीत समाजमाध्यमांचा अतिरेकी वापर किती भयानक ठरतो आहे, हे ज्वलंत वास्तव या माहितीपटातून अतिशय प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. समाजमाध्यमांच्या आहारी जात असणारी विविध वयोगटांतील माणसे व समाजमाध्यमांचे त्यांच्यावर होत असलेले परिणाम, समाजमाध्यमांचा कुटुंबव्यवस्थेवर होणारा परिणाम ही वस्तुस्थिती या माहितीपटाद्वारे समोर येते. समाजात होत चाललेल्या बदलांचेही दर्शन त्यातून घडते. समाजमाध्यमांमध्ये पूर्वी उच्च पदांवर काम केलेल्या तज्ज्ञांकडून पडद्यामागचे विश्वही या माहितीपटात उलगडत जाते. त्यामुळे सध्याची हाताबाहेर जात असलेली परिस्थिती आणि भविष्यात आपल्यासमोर उभे ठाकणारे संभाव्य धोके या दोन्हींची जाणीव होत जाते. आज जगभरातील मोबाइलधारकांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणा-या फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, गुगल, यू-ट्यूब, ॲपल, पाम, पिंटरेस्ट अशा विविध समाजमाध्यमांमध्ये अगदी महत्त्वाच्या, जबाबदारीच्या पदांवर काम केलेल्या उच्चपदस्थांनी या प्रांतांवर केलेले भाष्य आणि त्यांनी लक्षात आणून दिलेले धोके या विषयाचे गांभीर्य अधिकच अधोरेखित करतात. 'लोकांच्या हितासाठी आणि उपयुक्ततेसाठी सुरू झालेली समाजमाध्यमे' ते 'अराजकाला निमंत्रण देणारी आणि अनिर्बंधतेमुळे सार्वत्रिक दुष्परिणाम करणारी समाजमाध्यमे' हा एक मोठा प्रवास या माहितीपटातून उलगडत जातो आणि आजूबाजूच्या सामाजिक वास्तवाची प्रखर जाणीव दर्शकांना करून देतो.

जी समाजमाध्यमे एका टप्प्यावर खरोखर वरदानासम भासत होती ती आजच्या घडीला शाप ठरत आहेत आणि दुर्दैवाने त्यांचा वापर करणारे अब्जावधी लोक मात्र त्यापासून अद्याप अनभिज्ञ आहेत. समाजमाध्यमे हे एक दुधारी शस्त्र आहे आणि त्याची दुसरी बाजू आता अधिक प्रखरतेने त्याचा प्रभाव दाखवू लागल्याचे वास्तव आपण अनुभवतो आहोत, असे या क्षेत्रातील जाणकार आता बोलू लागलेले आहेत. अनेक देशांमध्ये विविध कारणांनी उफाळून येणारा असंतोष, विविध प्रकारची आंदोलने, राजकीय अपप्रचार, चारित्र्यहनन अशा विविध गोष्टींमागे समाजमाध्यमांवरून केला जाणारा प्रसार कारणीभूत असल्याची वस्तुस्थिती लक्षात येते आहे. त्याचप्रमाणे, समाजमाध्यमांच्या व्यासपीठाचा दुरुपयोग करून होत असलेले 'ट्रोलिंग', छायाचित्रांद्वारे-दृक श्राव्य चलचित्रांतून केली जाणारी समाजमनाची दिशाभूल या सगळ्या गोष्टी पाहता समाजमाध्यमांचा हा वापर धोकादायक ठरू लागला आहे. या सगळ्याचा वैयक्तिक पातळीवर आणि मानसिकतेवर होणारा दुष्परिणाम आणखीनच गंभीर आहे. समाजमाध्यमांद्वारे आभासी विश्वात कोणाशी ना कोणाशी सतत जोडलेले राहण्याच्या धडपडीतून माणसांमध्ये वास्तव विश्वातील जगण्यात वेगाने वाढत असलेले एकारलेपण, व्यक्तीच्या निर्णयक्षमतेवर, आकलनशक्तीवर आणि कल्पनाशक्तीवर समाजमाध्यमांचे होत असलेले दुष्परिणाम, न्यूनगंड या गोष्टी आता प्रकर्षाने जाणवू लागलेल्या आहेत.

समाजमाध्यमांचा वापर करीत असताना त्यांतील उपयुक्तता केवळ पाहिली जाते. येणारी प्रत्येक नवीन सुविधा आपल्या सोयीसाठीच आहे असे मानून तिचा वापर केला जातो. परंतु, समाजमाध्यमांचे व्यसन समाजमनाला लावण्यासाठी जाणीवपूर्वक केले जाते हे मात्र लक्षातच येत नाही, असे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. समाजमाध्यमांवर अधिकाधिक काळ लोक कसे राहतील आणि त्यांच्या वापरात गुंतून कसे पडतील हा विचार जागतिक स्तरावर कार्यरत असणा-या या क्षेत्रातील कंपन्यांच्या केंद्रस्थानी असतो. समाजमाध्यमांचा लोकांनी वापर करावा इतका मर्यादित हेतू त्यांचा कधीच नसतो. तर, त्या मागे मोठी आर्थिक गणिते असतात. त्यासाठी या सगळ्या क्लृप्त्या सातत्याने केल्या जातात. बहुराष्ट्रीय कंपन्या



त्यांचे मुख्य उद्दिष्ट कधीही जाहीर करीत नसल्या तरी अधिकाधिक लोक समाजमाध्यमांवर राहण्यातच त्यांचे हित दडलेले असते आणि त्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊन आपल्याला त्या जाळ्यात अडकवत राहतात, अशी स्पष्ट भूमिका या विषयातील जाणकार व्यक्त करतात.

हे अंतःस्थ हेतू साध्य करण्यासाठी मोठ्या संघटित बहुराष्ट्रीय कंपन्या समाजमाध्यमांचा किती बेमालूमपणाने वापर करतात आणि माणसे त्या जाळ्यात कशी अडकत जातात हे पाहून अवाक व्हायला होते. लोकांच्या मानसिकतेचा नेमकेपणाने अभ्यास करून तिच्याशी खेळत, लोकांच्या खासगी आयुष्यातील व्यक्तिगत माहितीचा बेमालूमपणाने वापर करीत त्यांना नाचवले जाते आणि हळूहळू माणूस समाजमाध्यमांच्या प्रभावापुढे अगतिक होत आपले स्वत्व हरवून बसतात.

समाजमाध्यमांवर कुणीही व्यक्ती जेव्हा जेव्हा जाते तेव्हा तिला सतत तिथे काही तरी नवे घडताना दिसत असते. तिला तिथे गुंतवून ठेवण्याची यंत्रणा सज्ज असते. तिथे त्या व्यक्तीने गुंतून राहावे म्हणून पडद्यामागे किती प्रयत्न सुरू असतात याची मात्र आपल्याला कल्पना नसते. अमुक एक व्यक्ती कोणत्या वेळी कशी वागेल, नेमके काय पाहील याचा पूर्णतः अभ्यास करून त्या त्या व्यक्तीच्या मानसिकतेचा पूर्ण आलेख रेखाटलेला असतो. प्रत्येक व्यक्तीच्या सर्व 'ऑनलाइन' हालचालींची अचूक नोंद ठेवली जाते. प्रत्येक व्यक्ती ही समाजमाध्यमांमध्ये असणा-या तंत्रज्ञांसाठी निव्वळ एक उत्पादन असते आणि सतत समाजमाध्यमांशी प्रत्येकाला जोडून ठेवणे हेच त्यांचे मुख्य काम. त्यासाठी 'अल्गोरिदम' आणि कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर तंत्रज्ञांकडून खुबीने केला जातो. या सगळ्याची वापरकर्त्याला सूतराम कल्पना नसते. 'मला हवे होते ते समोर कसे आले' यातच तो खूष असतो. या 'अल्गोरिदम'चे नेमके रहस्य काय आहे, त्याचा प्रभावी वापर करून समाजमाध्यमांचे व्यसन कसे लावले जाते आणि मग त्यातून बाहेर पडणे किती अवघड होते हे शेवटपर्यंत कोणाच्याच लक्षात येत नाही.

व्यक्तीच्या मनःस्वास्थ्यावर समाजमाध्यमांचा होणारा गंभीर परिणाम हा यांतील सर्वांत कळीचा मुद्दा होय. लोकांच्या मनःस्थितीचा, स्वभावाचा, आवडी-निवडींचा अतिशय बारकाईने अभ्यास करून, त्याची नोंद ठेवून

मोबाइलच्या पडद्यावर सतत काही ना काही दाखवले जाते. यातूनच समाजमाध्यमांचे व्यसन लागते. त्यामुळे समाजमाध्यमांवर रेंगाळत राहण्याचा लोकांचा कालावधी वाढतो आहे. समाजमाध्यमांवर जे सातत्याने दिसत असते त्यातून आपल्या आयुष्यामध्ये काहीही वेगळे, विशेष घडत नाही अशी भावना व्यक्तीच्या मनात निर्माण होते व त्या न्यूनगंडातून व्यक्ती नकारात्मक विचार करू लागते. त्यामुळे आत्मविश्वासही गमावून बसते. या खेरीज, कुटुंबातील सदस्यांशी परस्परसंवाद कमी होणे, आभासी जगातच रमावेसे वाटणे, निर्णयक्षमता हरवून बसणे, एकाग्रतेचा अभाव असणे असे अनेक धोके व्यक्तींमध्ये दिसू लागले आहेत. मोबाइलकडे सतत हात जाणे ही त्या व्यसनाची सुरुवात असते. पुढे त्यातूनच समाजापासून दुरावत जाऊन एकलकोंडेपण अधिकच वाढत जाते. चटकन राग येणे, परिस्थिती हाताळता न येणे, छोट्या छोट्या कारणांवरून अचानक हिंसक होणे तसेच आत्महत्या करण्यापर्यंतची टोकाची पावले उचलणे या सारख्या गंभीर प्रवृत्तीही आता निदर्शनास येऊ लागल्या आहेत. त्यामुळे त्याचे धोके जाणवू लागले आहेत.

या सगळ्याचा दुसरा आणखीन गंभीर परिणाम होतो आहे, तो समाजस्वास्थ्यावर. समाजमाध्यमांवर ज्या गोष्टी दाखवल्या जातात त्यांचा खोल परिणाम समाजमनावर होत असतो. समाजविघातक शक्तींकडून अनेकदा त्याचा गैरवापरही केला जातो. समाजमाध्यमांचा वापर असाच अनिर्बंध पद्धतीने होत राहिल्यास अनेक देशांतील लोकशाही व्यवस्था धोक्यात येतील, ठिकठिकाणी मोठी आंदोलने भडकतील आणि त्यातून अराजकाला आणि हिंसेला निमंत्रण मिळेल, अशी भीती समाजमाध्यमांचे जाणकार व्यक्त करीत आहेत. 'ट्रोलिंग' करून एखाद्याला त्रास देण्याबरोबरच बनावट बातम्यांद्वारे समाजाची दिशाभूलही केली जाते. राजकीय व्यवस्थांमध्येही समाजमाध्यमांचा चुकीचा वापर होत असल्याचे दिसून आले आहे. अलीकडच्या काही आंदोलनांच्या प्रसारामागे समाजमाध्यमेच होती व त्यांच्यामुळेच आंदोलनांची तीव्रता आणि प्रक्षोभकता वाढवण्यात आली होती, असे आढळून आले आहे. अनेक ठिकाणी घडलेल्या हिंसक घटनांमागेही समाजमाध्यमांवर प्रसारित होणारा मजकूर कारणीभूत ठरलेला



आहे. समाजमाध्यमांचे व्यासपीठ वापरून तिथे निःशुल्क प्रसारित करता येणारा मजकूर आणि एकाचवेळी लाखो लोकांपर्यंत पोहोचण्याची अत्यंत प्रभावी क्षमता यामुळे बनावट बातम्या, व्हिडिओ किंवा एखाद्या संवेदनशील विषयावरील जहाल भाष्य सर्वदूर पोहोचवून आंदोलनांची तीव्रता वाढवण्यात यश मिळते आहे. चीनपासून स्वायत्त होऊन स्वतंत्र हक्कांसाठी झगडणा-या हाँगकाँगमधील आंदोलनादरम्यान ऑनलाइन मोहिम अत्यंत प्रभावीपणाने राबवण्यात आली होती. तेथील असंतोषाची भूमिका जगभर पोहोचवण्यात समाजमाध्यमांनीच त्यांना साथ दिली. अल्जेरियामध्ये २०१९ साली सरकार आणि लष्कराच्या विरोधात नागरिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. हे आंदोलनदेखील समाजमाध्यमांवर होणा-या चर्चेतून प्रेरित झालेले होते. इराणमधील सुमारे आठ कोटींहून अधिक लोकसंख्येपैकी ६५ टक्क्यांहून लोक इंटरनेट आणि समाजमाध्यमांचा वापर करतात. त्यामुळे जेव्हा तिथे इंधनाच्या किंमतीत वाढ झाली तेव्हादेखील समाजमाध्यमांवर व्यक्त झालेला नागरिकांचा असंतोष कारणीभूत ठरला होता. भारतात जम्मू-काश्मीरपासून विविध जातीय-धार्मिक दंगलींच्या मागे समाजमाध्यमांवरून प्रसारित होणारी माहिती कारणीभूत असते असे समोर आले आहे. त्यामुळे, वरकरणी समाजमाध्यमे लोकहिताचे किंवा संवादाचे उपयुक्त साधन वाटत असली तरी त्यांचे दुसरे रूप हे अराजकाला निमंत्रण देणारे शाबीत होऊ शकते. समाजमाध्यमांचा अतिरेकी वापर व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक अशा सर्वच बाबतींत अतिशय धोकादायक ठरू शकतो, अशी भीती समाजशास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत.

अमेरिकेतील 'सिलिकॉन व्हॅली'मध्ये स्थित बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे विविध समाजमाध्यमांची मालकी आणि सूत्रे आहेत. समाजमाध्यमांचा जितका प्रसार होतो त्यातून अब्जावधींचा नफा या कंपन्या मिळवत असतात. त्यासाठी त्यांचे लक्ष असते माणसाच्या वेळेवर. जितका अधिक वेळ माणूस समाजमाध्यमांवर रेंगाळेल तितका नफा अधिक. त्यामुळे माणूस अधिकाधिक तिथे राहण्यासाठी विविध सुविधांचे जाळे त्याच्यावर सातत्याने फेकले जाते. मात्र, त्याचा समाजावर, माणसांवर कोणता दूरगामी दुष्परिणाम होतो आहे याची पर्वा न करता किंवा त्या विषयी कोणतेही भाष्य न करता

निव्वळ नफ्यासाठी सारे काही सुरू आहे. या अनिष्ट वास्तवाचाच उबग येऊन अशा नामांकित कंपन्यांतून बाहेर पडलेल्या उच्चपदस्थांनी समाजमाध्यमांची काळी बाजू या माहितीपटाच्या पडद्याद्वारे उघड केली आहे.

'गुगल' कंपनीमध्ये Design Ethicist म्हणून काम करणारे Tristan Harris यांना समाजमाध्यमांच्या पडद्यावरच्या या समग्र खेळाची आणि पडद्यामागे सुरू असलेल्या वास्तवाची बोचरी जाणीव झाली. त्या अस्वस्थतेच्या जाणिवेतून काही तरी बदल घडणे आवश्यक आहे असे वाटून ते 'गुगल' मधील चांगली नोकरी सोडून बाहेर पडले. समाजमाध्यमांचे दडवले जाणारे सत्य जगासमोर आणण्यासाठी त्यांनी Center For Human Technology या संस्थेची स्थापना केली. समाजमाध्यमांच्या नव्या विळख्यातून मानवी जीवन बाहेर काढावे आणि माहिती-तंत्रज्ञान व समाजमाध्यमांच्या क्षेत्रात बदल घडवता यावेत या दिशेने ही संस्था काम करते आहे. Tristan Harris यांच्या मते, आज जगभरात सगळीकडे वेगवेगळ्या पातळ्यांवर उलथापालथ सुरू आहे. हे जे घडते आहे ते सहज दुर्लक्ष करण्याजोगे नक्कीच नाही. उलट त्याकडे अधिक गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. गंमत म्हणजे, तंत्रज्ञान उद्योगाशी संबंधित माणसांना समाजमाध्यमांच्या विश्वात आत काय घडते आहे आणि काय घडवले जाते आहे याची पूर्ण कल्पना असते. परंतु, समाजमाध्यमांचा वापर करणारा सामान्य माणूस - जो या सगळ्यांत बाहुले बनवून नाचवला जातो आहे - तो अजून अंधारातच आहे. त्याला नाण्याची दुसरी बाजूच माहीत नाही. समाजमाध्यमे कोणत्या पद्धतीने कार्यान्वित होतात आणि त्या मागची कार्यशैली काय आहे ही वस्तुस्थिती समजेल तेव्हाच या जाळ्यात आपण कसे अडकत चाललो आहोत हे त्याच्या लक्षात येईल. ते सारे सत्य जगासमोर प्रकट होईल तेव्हाच त्याचे गांभीर्य लक्षात येईल आणि बदल होण्याच्या शक्यता निर्माण होतील. आज समाजमाध्यमांचा प्रसार करणा-या सगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्या ही माध्यमे जनसामान्यांना अधिकाधिक कशी आवडतील आणि त्यांची सवय लोकांना कशी लागेल याचा विचार करताना दिसतात. परंतु, त्याच्या संभाव्य गंभीर परिणामांविषयी मात्र कुणी अवाक्षरही बोलायला तयार नाही. वस्तुतः आजच्या घडीला २०० कोटी लोक समाजमाध्यमांवर जोडलेले असतील



तर त्याच्या परिणामांचाही गांभीर्याने विचार व्हायलाच हवा. 'गुगल' हे केवळ 'सर्च इंजिन' आहे आणि 'फेसबुक' हे छायाचित्रे पाहण्याचे, संवाद साधण्याचे एक व्यासपीठ आहे असेच आपण सगळे गृहित धरतो. कारण तसेच चित्र आपल्यासमोर रंगवलेले असते. परंतु आपले लक्ष वेधून घेण्यासाठी ही सगळी धडपड सुरू आहे, हा पडद्यामागचा खेळ कधी कोणाला लक्षातच येत नाही.

'पिंटरेस्ट' चे माजी अध्यक्ष Tim Kendall यांच्या मते 'फेसबुक' जेव्हा नवीन होते तेव्हा तिथे काम करणा-यांना 'गुगल' आदर्श वाटत होते. कारण 'गुगल'ने लोकांच्या हिताच्या अनेक सेवा दिल्या आणि त्यातून भरपूर पैसाही कमावला. 'फेसबुक'सारख्या समाजमाध्यमांनी त्यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन 'बिझनेस मॉडेल्स' तयार केली आणि त्यांचा प्रसार केला. परंतु, लोकांवर त्याचा परिणाम काय होऊ शकतो याचा विचार कुणीच केला नाही. लोकांच्या आयुष्यातील अधिकाधिक वेळ आपण कसा ओढून घेऊ शकतो या धडपडीतून त्याच्या परिणामांची पर्वा न करता हे सारे घडवले जाऊलागले. 'फेसबुक' मध्ये पूर्वी काम करणारे Justin Rosenstein यांच्या मते, इंटरनेटवर जी समाजमाध्यमे उपलब्ध आहेत ती मोफत आहेत यात आपण समाधानी असतो. परंतु, ही सुविधा मोफत नसते. त्यासाठी जाहिरातदार खर्च करतो. त्याच्या मोबदल्यात त्याला जाहिरात दाखवायची असते. समाजमाध्यमांच्या आडून हा जाहिरातींचा बाजार सुरू होतो. आपल्याही नकळत आपण त्यात अडकतो. 'ट्विटर'मध्ये पूर्वी कार्यरत असणारे तंत्रज्ञ Jeff Seibert यांच्या मते, इंटरनेटच्या माध्यमातून 'ऑनलाइन' जे जे काही केले जाते त्या प्रत्येक गोष्टीवर आता बारकाईने लक्ष ठेवले जाते आहे. त्याची नोंद केली जाते आहे.

समाजमाध्यमांमध्ये काम करणारी तंत्रज्ञांची यंत्रणा प्रत्येकावर लक्ष ठेवून आहे. एखादी व्यक्ती कोणत्या वेळी काय पाहू शकेल आणि त्यांच्या नेमक्या आवडीनिवडी कोणत्या या सगळ्याचा अभ्यास करून अचूक पूर्वानुमान बांधले जाते. तेच वारंवार दाखवले जाते आणि एका जाळ्यात ओढले जाते. अब्जावधी माणसे या जाळ्यात याच पद्धतीने खेचली गेलेली आहेत. **(कृपया पृष्ठ क्र. २९ पाहावे)**

*(पृष्ठ क्रमांक १४ वरून)*

अमेरिकेमध्ये जन्माला येऊन पुढे सगळ्या जागतिक अर्थव्यवस्थेलाच ऑक्टोपसप्रमाणे वेटाळणा-या त्या वित्तीय अरिष्टाकडे विस्तारवादी, आक्रमक, निरंकुश भांडवलशाही व्यवस्थेचे किटाळ म्हणूनच बघितले गेले. त्यांतच, १५ सप्टेंबर २००८ या दिवशी लेहमन ब्रदर्स या अमेरिकी बलदंड वित्तसंस्थेने दिवाळे घोषित केल्यानंतर अमेरिकी शेअर बाजारांतील भूकंपाने जगाच्या कानाकोप-यांतील देशांमधील शेअर बाजारांना जे जबर हादरे पोहोचविले त्यांमुळे जागतिकीकरणाचा चेहरा वास्तवात कमालीचा विक्राळ आणि उत्पातक असण्याबाबत सगळ्यांचीच खातरजमा झाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील अनुस्युत धोकेही त्यांद्वारे उघड झाले. या हाद-याने वैश्विक अर्थव्यवस्था रूळांवरून पारच घरंगळली. बुडित कर्जांच्या भाराखाली दबलेल्या अमेरिकी बँकांचा खचलेला भांडवली पाया ओबामा यांनी सरकारी तिजोरी खुली करून सावरला. परंतु, मंदीपायी रोजगार गमावलेले अगणित सर्वसामान्य अमेरिकी नागरिक मात्र उपेक्षितच राहिले. मंदीच्या चपेट्यात आलेल्या अन्य देशांमधील चित्रही जवळपास असेच होते व राहिले.

याचा परिणाम म्हणजे, २००८ सालानंतर विस्तारलेल्या आर्थिक अरिष्टाची मुळे, अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण आणि वित्तव्यवस्थेची तिच्यावरील वाढती पकड यांत खोलवर रुजलेली आहेत, अशी धारणा सर्वसामान्य अमेरिकी नागरिकाच्या मनात यथावकाश क्रमाने दृढ बनली. वैश्विक वित्तीय सामर्थ्याचे केंद्र गणले जाणारा वॉल स्ट्रीट आणि वॉशिंग्टन (म्हणजेच, जागतिक सत्तातोलामध्ये अजोड गणल्या जाणा-या अमेरिकी अध्यक्षांचा वॉशिंग्टन येथे असणा-या व्हाइट हाऊसमधील सत्तापरीघ) यांचे साटेलोटेवजा गुळपीठ कष्टकरी आणि मध्यमवर्गीयांच्या हिताला डावलते, अशी लोकभावना अमेरिकी समाजामध्ये तिथपासून स्थिरावू लागली. केवळ इतकेच नाही तर, सर्वसामान्यांच्या कल्याणाचे संगोपन-संवर्धन जारी राखण्यात प्रातिनिधिक लोकशाही राज्यव्यवस्था कमकुवत, नाकाम ठरत असल्याची भावनाही जनमानसात या सगळ्यांतून प्रखर बनू लागली. एकाधिकारशाहीस अनुकूल मनोभूमी असणा-या डोनल्ड ट्रम्प यांनी नेमक्या त्याच अस्वस्थ मानसिकतेचा लाभ विलक्षण चाणाक्षपणे उठविला.



सर्वशक्तिमान गणल्या जाणा-या अमेरिकी अध्यक्षपदासाठी २०१६ साली होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये दंड थोपटले. सर्वसामान्य अमेरिकी नागरिकाच्या मानसिक अस्थिरतेला कारणभूत ठरणा-या आर्थिक मुद्यांवरच प्रचाराचा सारा रोख स्थिर राहील, याची काळजी घेत प्रचाराबाबतची आपली व्यूहरचना ट्रम्प यांनी आखली. कमकुवत बनलेली अमेरिकी अर्थव्यवस्थेतील सरासरी उत्पन्नवाढ, वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगाराचा तिथे घडून आलेला -हास आणि अर्थसत्तेचे व संपत्तीचे बेलगाम केंद्रीकरण चालू राहण्याने अमेरिकी अर्थकारणात बळजोर बनलेली आर्थिक विषमता, हे २०१६ सालातील अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीदरम्यानच्या प्रचाराचे तीन प्रमुख मुद्दे होते. वास्तविक पाहता, अर्थकारणातील त्या तीनही दोषांची बीजे अमेरिकी अर्थव्यवस्थेतील परिस्थितीमध्येच अंकुरलेली होती. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील उत्पादनप्रक्रियेचे वाढते यांत्रिकीकरण आणि स्वयंचलीकरण, उद्योगव्यवसायांच्या जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढत्या प्रमाणावर केला जाणारा अंगीकार आणि सामाजिक सुरक्षेचे विरळ होत चाललेले कवच ही त्या तिपदरी आर्थिक दुरवस्थेच्या उत्पत्तीमागील कारणे होती.

त्यांतही तुलनेने अधिक कळीचा मुद्दा ठरत राहिला तो सामाजिक सुरक्षेच्या कवच्याचा. २००८ साली उद्भवलेल्या अक्राळविक्राळ वित्तीय अरिष्टामधून अमेरिकी अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी योजलेल्या उपाययोजनांपायी अमेरिकी सरकारच्या खात्यावरील तूट प्रचंड फुगली. एकीकडे मंदीपायी रोडावलेला करमहसूल आणि दुसरीकडे सरकारी खर्चाला पायबंद घालण्यावरील परिस्थितीजन्य मर्यादा या कात्रीत सापडलेल्या अमेरिकी धोरणकर्त्यांच्या पुढ्यात काही प्रकारच्या सरकारी खर्चाला कात्री लावण्याव्यतिरिक्त अन्य पर्यायच राहिला नाही. त्याचा फटका बसला सार्वजनिक सुरक्षेवरील वित्तीय तरतुदीला. मात्र, त्या सगळ्याकडे सोयीस्कर काणाडोळा करत सारे खापर फोडले गेले ते जागतिकीकरणाच्या आणि उदारीकरणाच्या माथ्यावर. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील या शबलतांवर उपाययोजना शोधण्याऐवजी ट्रम्प यांनी खुला पवित्रा स्वीकारला तो उदारीकरणाच्या धोरणदृष्टीला विरोध करण्याचा.

आपण सत्तेवर आलो तर खुल्या व्यापाराचा पाठपुरावा करणा-या धोरणांना पायबंद घालू, अमेरिकी सत्तेचे दोर हाती आल्यास चीन आणि मेक्सिको या दोन देशांमधून आयात केल्या जाणा-या वस्तू व सेवांवर जबर आयातशुल्क आकारले जाईल, अमेरिकी मतदारांनी पदरात पसंतीचे माप टाकल्यास उत्तर अटलांटिक मुक्त व्यापार क्षेत्रासंदर्भातील (North Atlantic Free Trade Area) तरतुदींबाबत अमेरिका फेरवाटाघाटी करील आणि त्यांत मनाजोगे यश प्राप्त झाले नाही तर संबंधित करारमदारांना केराची टोपली दाखवली जाईल, अमेरिकेचे अध्यक्षपद हातात आले तर 'ट्रान्स पॅसिफिक पार्टनरशिप'मधून अमेरिका बाहेर पडेल तसेच, अमेरिकेच्या व्यापारी हितसंबंधांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने जागतिक व्यापार संघटनेमधूनही प्रसंगी बाहेर पडण्यास आपण मागेपुढे बघणार नाही...अशी आश्वासनांची खैरातच जणू ट्रम्प यांनी त्यांच्या प्रचारादरम्यान अमेरिकी मतदारांवर केलेली होती. २०१६ सालातील अध्यक्षीय निवडणुकीत बाजी मारल्यानंतर त्यांनी त्या आश्वासनांची पूर्तता करण्यास धडाक्याने प्रारंभ केला. चीनच्या विरोधात व्यापारी युद्धाची आघाडी उघडणे हा ट्रम्प यांच्या त्याच धोरणदृष्टीचा एक स्वाभाविक घटक होता.

अमेरिका आणि चीन यांच्यादरम्यान साधारणपणे १९८०च्या दशकापासून विकसित होत आलेल्या व्यापारी संबंधांचा पोत बदलण्यास सुरुवात झाली ती डोनल्ड ट्रम्प यांनी २०१६ साली अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हापासून. जागतिक व्यापार संघटना १९९५ सालीच अस्तित्त्वात आलेली असली तरी, चीनने तिचे सदस्यत्व स्वीकारले ते पुढे सहा वर्षांनी, म्हणजे, २००१ साली. त्या नंतरचे दीड दशकही चांगले पार पडले. मात्र, जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठाचा गैरफायदा चीन उठवतो आहे, अशी तक्रार ओबामा यांच्या कारकिर्दीतच चालू झालेली होती. त्या तक्रारीलाही विविध पदर होते. जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठाद्वारे मिळणा-या सवलती व मोकळिकीचा चीन सरसहा गैरफायदा उठवतो आहे, ही राहिली अमेरिकेची मुख्य तक्रार. व्यापारविषयक व्यवहारांमध्ये चीनकडून अप्रामाणिकपणाचे वर्तन घडते आहे, असाही अमेरिकी धोरणकर्त्यांचा आक्षेप सतत राहिला.



**आधी तक्रार मग युद्ध**

चीनच्या व्यापारविषयक व्यवहाराविरोधात अमेरिका सातत्याने घेत राहिलेल्या आक्षेपांमधील एकाचा संबंध होता तो २००८ साली फुटलेल्या 'सबप्राइम' कर्जांच्या फुग्याशी. 'सबप्राइम' कर्जांच्या फुटलेल्या त्या अमेरिकी फुग्यातून जगभरात पसरलेल्या मंदीच्या पर्वात चिनी निर्यातीवर त्या मंदीची कोणतीही आच येऊ नये यासाठी अमेरिकी डॉलर आणि चिनी युआन यांच्यादरम्यानचा विनिमय दर युआनला अनुकूल असणा-या पातळीवर चीन कृत्रिमरीत्या राखतो आहे, असा तक्रारीचा सूर अमेरिकी धोरणकर्त्यांच्या विश्वातून २०१० सालानंतरच मुखर होण्याला सुरुवात झालेली होती. त्याच्याच जोडीने, वैश्विक बाजारपेठेमध्ये चिनी वस्तू व सेवांच्या किमती स्पर्धात्मक राखणे चिनी उत्पादकांना शक्य बनावे यासाठी त्यांच्यावर अनुदानांची खैरात चीन करतो यांबाबतही अमेरिकेची नाराजी राहिली.

केवळ इतकेच नाही तर, अमेरिकी तंत्रज्ञांनी संशोधलेल्या शास्त्रीय तसेच तंत्रशास्त्रीय संकल्पनांची चोरी चीन सरसहा करतो, अशीही अमेरिकेची जोरदार तक्रार असे. अमेरिकी भांडवलाला चिनी भूमीवर लाल पायघड्या अंथरत असतानाच, दुसरीकडे, चीन अमेरिकी कंपन्यांची तंत्रशास्त्रे लांबवतो, हेही अमेरिकेचे दुखणे होतेच. हे पुरेसे नाही म्हणून की काय, त्याच्याच जोडीने चीन बौद्धिक संपदा स्वामित्वविषयक संकेतही धाब्यावर बसवतो, हे अमेरिकी उद्योगघटकांचे जबर शल्य होतेच. जोमदार आणि सातत्यशील आर्थिक भरभराटीचा पाठपुरावा करण्याच्या भरात, चीन, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासंदर्भातील वैश्विक स्तरावरील मार्गदर्शक तत्त्वांशी बांधिलकी जपत नाही, यांबाबत एकंदरीने सार्वत्रिक नाराजी होतीच.

जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठाद्वारे देशादेशांमध्ये बहुस्तरीय खुला व्यापार वाढीस लागावा अशी सार्वत्रिक अपेक्षा असताना चीनचे अशा प्रकारचे अ-प्रामाणिक वर्तन आणि व्यापारविषयक अनुचित, गैर कार्यपद्धतीचा वापर यांबाबत जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावर आधीपासूनच तक्रारी नोंदवल्या जात होत्या. 'अमेरिका फर्स्ट'चा नारा देत आणि आर्थिक राष्ट्रवादाचा झेंडा उघडपणे उभारत सत्ता स्वीकारल्यानंतर ट्रम्प यांनी २३ मार्च २०१८रोजी चीनविरुद्ध अधिकृतपणेच व्यापारी युद्ध छेडले.

अर्थात, टाळी एका हाताने कधीच वाजत नसते. चीनच्या विरोधातील व्यापारी युद्धाला हे जे तोंड फुटले त्याला काही अंशी ट्रम्प यांची धोरणविषयक कार्यपद्धतीही खतपाणी पुरवत राहिली. विदेशी व्यापारासंदर्भातील समकालीन अशा आंतरराष्ट्रीय कायदेकानूंची पायमल्ली करण्याचाच ट्रम्प यांचा सर्वसाधारण खाक्या राहिला. पूर्वापार अस्तित्त्वात असलेल्या बहुदेशीय व्यापारी करारमदारांच्या व्यवस्थेला वाटाण्याच्या अक्षता लावण्याकडेच ट्रम्प यांचा कल बव्हंशी होता. 'आर्थिक राष्ट्रवादा'च्या भूमिकेचा हिरिरीने पुरस्कार-अंगीकार करत विदेशी स्पर्धेपासून देशी उद्योगघटकांना संरक्षण पुरविणे, अमेरिकेच्या व्यापारी भागीदारांच्या आर्थिक हितसंबंधांची फारशी कदर मुदलातच न बाळगणे हाच ट्रम्प यांचा सत्तास्वीकारोत्तर धोरणविषयक पायंडा राहिला. त्याला अनुसरतच, चीनच्या विरोधात खुलेआम व्यापारी युद्ध छेडल्यानंतर चीनमधून अमेरिकी बाजारपेठेत आयात केल्या जाणा-या पोलाद आणि ॲल्युमिनियम या दोन जिनसांवर २०१८ साली ट्रम्प यांनी जाचक शुल्क आकारणी जारी केली. चीनच्या विरोधात पुकारलेल्या व्यापारी युद्धाची आघाडी ट्रम्प यांच्या सत्तासंपादनानंतर दोनएक वर्षांनी अशा रीतीने प्रगट झाली हे खरे असले तरी, त्या दिशेने पहिले पाऊल उचलले गेले होते ते २०१७ सालीच.

जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व चीनने २००१ साली स्वीकारलेले होते तरी, 'बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असा दर्जा जागतिक व्यापार संघटनेने चीनला बहाल केला तो २०१७ साली. जागतिक व्यापार संघटनेच्या त्या कृतीला आक्षेप राहिला तो अमेरिकेचा. त्याला कारणही तसेच सबळ होते. 'बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असा दर्जा चीनला बहाल केला जाण्याने, चिनी कंपन्यांनी उत्पादन केलेल्या मालाच्या स्पर्धेपासून देशी उद्योगांना संरक्षण पुरविण्याच्या अमेरिकी संधी व शक्यतांमध्ये एकतर कपात संभवली असती अथवा असे संरक्षण पुरविण्यावर मर्यादा तरी आल्या असत्या. परिणामी, चीन ही 'बाजारपेठीय अर्थव्यवस्था' आहे असे मानण्यास अमेरिकेने स्पष्ट नकार दिला आणि चीनविरोधातील व्यापारी युद्धाच्या दिशेने पहिले पाऊल पडले अथवा उचलले गेले. चीनच्या विरोधातील व्यापारी कारवाई मग अमेरिकेने हिरिरीने सुरू केली.



अमेरिकी बाजारपेठेत चीनमधून आयात केल्या जाणा-या जिनसांवर जाचक आयात शुल्कांची आकारणी करणे, कळीच्या तंत्रशास्त्रीय उद्योगक्षेत्रांत चिनी गुंतवणुकीस निर्बंध घालणे...अशा प्रकारच्या आयुधांचा या युद्धामध्ये मग क्रमाने वापर चालू झाला. या युद्धाची झळ चिनी कंपन्यांना बसणे स्वाभाविकच होते. उच्च तंत्रज्ञानाधारित वस्तू आणि सेवांच्या उत्पादनामध्ये कार्यरत असणा-या चिणी उद्योगांच्या जागतिक स्पर्धात्मकतेची अमेरिकी निर्बंधांपायी हानी होत असल्याने अशा उद्योगांच्या वाढविकासाला खीळ बसत असल्याचे ध्यानात येताच तितकीच तीव्र प्रतिक्रिया मग चीनकडूनही उमटली. अमेरिकी वस्तू आणि सेवांवर बहिष्कार जारी करण्यापासून ते उच्च तंत्रज्ञानाधारित उद्योगांच्या देशी विकासाला जोरदार चालना देण्यासारखी पावले चिनी धोरणकर्त्यांनीही यथावकाश उचलली. जागतिक स्तरावरील खुल्या, मुक्त, बहुस्तरीय, बहुदेशीय व्यापारी संबंधांचा गोफ विणला जाण्यास जी अनुकूलता दुस-या महायुद्धानंतर क्रमाक्रमाने जागतिक समुदायाला लाभत आलेली होती तिचा नूर या सगळ्यांपायी पार पालटून गेला. २००८ साली उद्‌भवलेल्या वित्तीय अरिष्टामधून सावरण्याच्या वैश्विक अर्थव्यवस्थेच्या क्षमतांचा त्यांपायी -हास घडून येणे अपरिहार्यच केवळ नव्हे तर अनिवार्यही होते. जागतिक व्यापार संघटनेच्या परिणामकारकतेबाबत या उलथापालथींमुळे प्रगाढ प्रश्नचिन्ह उभे राहिले नसते तरच नवल !

या विस्कटाविस्कटीचा कडेलोटही झाला तो अमेरिकेच्याच आणखी एका आतताईपणामुळे. देशादेशांमधील व्यापारासंदर्भात प्रसंगवशात जी खेकटी अथवा वादविवाद उद्‌भवत त्यांचे रूपांतर फिर्यादीमध्ये घडून आल्यास त्यांचे निराकरण करण्यासाठी सात सदस्यांची न्यायिक संस्थात्मक व्यवस्था जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपासूनच कार्यरत बनविण्यात आलेली होती. या न्यायाधिकरणावरील काही न्यायाधिशांचा कार्यकाल ११ डिसेंबर २०२० या दिवशी संपुष्टात येतो आहे. निवृत्त होत असलेल्या न्यायाधिशांच्या जागी नवीन व्यक्तींची नियुक्ती करण्यास सपशेल नकार देऊन ट्रम्प यांच्या प्रशासनाने जागतिक व्यापार संघटनेच्या अर्थवत्तेलाच सुरुंग लावण्याची तयारी केलेली आहे. वयाची ऐन पंचविशी ओलांडत असलेले हे व्यासपीठ, मग, खंगेल नाही तर काय (?) ! ■■

(पृष्ठ क्रमांक २२ वरून)

हे अशाच प्रकारे सुरू राहिले तर आगामी दोन दशकांत खूप मोठ्या अराजकाला निमंत्रण दिले जाईल, अशी भीती या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. अंतर्गत कलह, राष्ट्राराष्ट्रांमध्ये युद्ध, लोकशाही व्यवस्थांचा अंत अथवा/आणि -हास, जातीय-धार्मिक दंगली, गुन्हेगारीमध्ये वाढ अशांसारख्या घटितांचे आपण या सगळ्यांपायी येत्या काळात साक्षीदार ठरत राहू, असा तज्ज्ञांचा सांगावा आहे. ज्या अनिर्बंध पद्धतीने समाजमाध्यमांचा प्रसार आज होतो आहे, त्याचे गंभीर परिणाम समाजात ज्या प्रमाणावर होताना दिसू लागले आहेत, ते बघता समाजमाध्यमांवर कुणाचा तरी अंकुश असणे आणि त्यांच्या व्यवहारांना नियमांची चौकट असणे गरजेचे ठरू लागलेले आहे. सायबर तंत्रज्ञान वापरणा-यांच्या रक्षणासाठी सायबर गुन्ह्यांशी संबंधित कायद्यांमध्येही सुधारणा होणे गरजेचे आहे, असे जाणकारांचे मत आहे. त्याचबरोबर, वैयक्तिक पातळीवरसुद्धा प्रत्येकालाच काही बदल स्वतःमध्ये करावे लागतील. समाजमाध्यमांच्या अतिरेकी आहारी जाण्याचे स्वतःवरच होणारे गंभीर धोके लक्षात घेऊन वेळेचा अपव्यय करणारी अधिकाधिक 'ॲप' आपल्या मोबाइल फोनवरून काढून टाकणे, सतत अवधान खेचून घेण्याचा प्रयत्न करणारी मोबाइलवरील 'नोटिफिकेशन्स' बंद करणे, कुटुंबासमवेत असताना मोबाइलचा वापर टाळणे, समाजात अधिकाधिक मिसळून संवाद साधत राहणे हेच पर्याय आपल्याकडे आहेत. समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापराचे आणि आपल्याला जाळ्यात ओढण्याच्या या खेळाचे आव्हान समजून घेतले तरच त्याचा परिणामकारक मुकाबला करणे आपल्याला शक्य बनू शकेल. ■■

---

**संदर्भ :**


1) https://www.nytimes.com/2020/09/09/movies/the-social-dilemma-review.html

2) https://www.solaceglobal.com/report/2019-year-unrest-powered-social-media/

3) http://polioeradication.org/news-post/statement-on-attack-on-health-workers-in-pakistan/




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

## अजंठा - एक सौंदर्यदर्शन

**लेखिका : डॉ. राधिका टिपरे**

**प्रकाशक : कृष्णा प्रकाशन**

**मूल्य : ९०० रुपये, पृष्ठ : ३१४**

जगभरातून आजही लोक आवर्जून धांव घेणा-या या लेणीसमूहाचे सौंदर्य आणि इतिहास केवळ अद्‌भुत आहे. अजिंठ्याच्या लेण्यांमधील भित्तीचित्रे प्राचीन असून ती तत्कालीन समाजजीवनाचा जणू आरसाच होत. पूर्वकालीन समाजजीवनाचे वास्तव आणि कलात्मक चित्रण त्या चित्रांद्वारे होत राहते. पौराणिक आणि सांस्कृतिक परंपरेचे एक समृद्ध दालन म्हणून या सर्व कलाकृतींकडे पाहिले जाते. अजिंठ्याच्या ३० गुंफांमध्ये दडलेले ते सारे सौंदर्यविश्व समजून घेत ते जगासमोर आणणे आणि त्याच वेळी संशोधकवृत्तीने त्याचा सखोल अभ्यास करणे गरजेचे होते. डॉ. राधिका टिपरे यांनी संशोधनासाठी या विषयाची निवड त्याच हेतूने केली. अजिंठा येथील लेण्यांमधील भित्तीचित्रांतून साधला जाणारा कलात्मक संवाद, सामाजिक आणि सांस्कृतिक विश्लेषण या विषयावर त्यांनी त्यांच्या संशोधनात लक्ष केंद्रित केले. प्राचीन भारतीय कलाविश्व आणि त्यांतल्या त्यांत प्राचीन भारतीय चित्रकला यांचा सविस्तर वेध घेत अजिंठा येतील लेण्यांमध्ये साकारलेल्या अजोड चित्रवैभवाचे आगळेपण, त्याचे संपन्न वैभव आणि असाधारणत्व डॉ. टिपरे यांनी संशोधकाच्या चिकित्सकपणे आणि उत्कट रसिकाच्या लाघवी रसमयतेने अचूक टिपून तितक्याच प्रत्ययकारी लेखनशैलीद्वारे या ग्रंथरूपाने वाचकांसाठी सादर केलेले आहे. प्रत्येक गुंफेतील शिल्परेखाटन वेगळी कथा सांगणारे आहे. सर्व शिल्पांचा आणि चित्रांचा अर्थ या ग्रंथात सचित्र उलगडल्याने या ग्रंथाचे संदर्भमूल्य अधिकच वाढते. साधारणपणे दोन हजार वर्षांपूर्वीचे समाजजीवन आणि एतद्देशीय कला व कलादृष्टी नेमकी होती तरी कशी ते समजून घेण्यासाठी प्रस्तुत ग्रंथ निश्चितच आधारसाहित्य म्हणून बहुमोल शाबीत होईल. प्राचीन शिल्पकला, चित्रकला तसेच लोकजीवनाचा अभ्यास करणा-या सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल असाच हा ग्रंथ साकारला आहे. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**